# नि. २९ वरील आदेश

सदरचा अर्ज हा प्र.वादी क्र. २ यांनी दि. १०/०५/२०२४ रोजी, मुदतीत दाव्यास कैफियत सादर न केल्याने झालेला विना कैफियत प्रकरण चालविणेचा आदेश रद्द करणेसाठी केलेला आहे. अर्जातील कथन पुढील प्रमाणे, प्रस्तुत प्रतिवादी यांनी सदर कामी सि.पी.सी आदेश ७ नियम ११ प्रमाणे अर्ज दाखल केल्यानंतर प्रतिवादी यांचा अर्ज मंजूर होवून प्रस्तुत वादी यांचा दावा काढून टाकण्यात येईल या प्रामाणिक समजुतीखाली प्रतिवादी होते परंतू न्यायालयाने प्रतिवादीचा अर्ज नामंजूर केल्यानंतर प्रतिवादीचे वकीलांनी कैफियत तयार करून ती मुख्यालयास मंजूरीसाठी पाठविली सदर कैफियत मंजूर होवून येण्यात काही अवधी गेला त्यामुळे प्रतिवादी यांना मुदतीत कैफियत दाखल करणे शक्य झाले नाही. सदर अर्जावर वादीचे म्हणणे मागविले. वादीचे विधिज्ञांनी सदर अर्जास हरकत घेवून, सदरचा अर्ज हा विनाकारण व केवळ काम लांबविण्याचा प्रयत्न म्हणून केलेला आहे. प्रतिवादीस कैफियत देणेस अंदाजे एक वर्षाचा विलंब झालेला आहे. इतका विलंब माफ करता येणार नाही असे म्हणणे दिले.

या न्यायालयाने दि. २०/०३/२०२३ रोजी प्रतिवादी क्र. २ हे समन्स ची बजावणी झालेनंतर देखील न्यायालयात हजर होवून देखील मुदतीत कैफियत न दिल्याने त्यांचे विरुध्द विना कैफियत प्रकरण चालविणेचा आदेश केला होता. सदर अर्जावर प्रतिवादी च्या वकिलांनी उपस्थित केलेली हरकत ही वैध वाटते परंतू न्यायाच्या हितास्तव व प्रतिवादींना त्यांचे म्हणणे दाखल करण्याची संधी देण्याकरिता सदरचा अर्ज मंजूर करणे क्रमप्राप्त वाटते. परंतू प्रतिवादींनी दि. २४/०३/२०२३ रोजी समन्सची बजावणी झाल्यापासून ते आजपर्यंत म्हणणे दाखल करणेस केलेला विलंब पहाता सदरचा अर्ज हा रू ३००/- इतक्या दंडावर मंजूर करणे योग्य राहील. वरील बाबींचा विचार करुन खालील आदेश पारीत करण्यात येत आहेत.

## आ दे श

१. अर्जदारचा नि. २९ वरील अर्ज र. रू ३००/- दंडासह मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादींनी सदरचा दंड वादीस द्यावा. त्या शिवाय प्रतिवादीचे म्हणणे पुराव्यात वाचले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

sd/-

सांगली. ( श्री. ओ. एस. शास्त्री )

दिनांक – १०/०५/२०२४. १ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.